




Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड

# जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com








वर्ष ३ रे | अंक : ७१७ . वा | शनिवार | दि. २३ मार्च २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये


## बाणावर आणि कमळावरही प्रतापराव नकोच मतदारांचा व कार्यकर्त्यांचा एकच सूर...

## विकास पुरुष भाईजी एक सर्वसमावेशक पर्याय...

जनसंचलन/बुलढाणा

भाग-13

बुलढाणा लोकसभा मतदारसंघात भाजपला फक्त निवडणुकीत वा-परुन घेणारा आणि नंतर भाजप कशी कमजोर होईल यासाठी सतत झटणारा बहचर्चित खासदार प्रतापराव यावेळी बाणा वरही नकोच नको तसेच कमळावरही नकोच अशी उघड चर्चा सर्वदूर सुरु आहे. उध्दव ठाकरे यांच्या भाषेत सांगायचे झाले तर जिल्ह्या-तील भाजप ही युतीमळे कमजोर च सडली झाली. भाजप मधिल कथित मुठभर प्रस्थापित नेते स्वतः च्या राजकीय जिल्ह्या-चा खासदार भाजप चा नको म्हणून च झटले व धडपडत आ-हेत असे च बहुतांश मोदी प्रेमी जनतेला वाटते आहे. निवडून आलेले प्रतापराव जाधव जेव्हा जिल्ह्यातील नगर परिषद, पंचायत समिती, सहकारी संस्था च्या निवडणुका आल्यावर भाजपला तोंडावर म्हणतात की भाजप चे कुठे अस्तित्व आहे. आम्ही देतो तेवढ्या एक दोन जागा घ्या. नाहीतर स्वतंत्र लढा. लोकसभा निवडणूक आली की म्हणतात मला नाही तर नरेंद्र मोदींना पंतप्रधान करण्यासाठी मला मतदान करा. थोडक्यात भाजपची कमजोरी प्रतापराव ओळखुन आ-हेत. त्यामुळे या मतदारसंघात भाजपच-ाच उमेदवार द्यावा आणि भाजपची वाढती लोकप्रियता आणि प्रभाव दाखविण्याची संधी भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांनी सोडुच नये. अशा मोदी प्रेमी मतदार राजाची जोरदार मागणी आहे. **प्रतापराव जाधव खासदार असतांना स्वतः च्या मुलाला जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत शिवसेनेच्या तिकीटावर निवडून आणू शकले नाही ते स्वतः च पंतप्रधान मोदी मुळे निवडून येतात आणि भाजपला सापत्न वागणूक देतात.यालाच म्हणतात चोराच्या उलट्या बोंबा.**

### उद्धव ठाकरेंनी समज दिली होती?

समृद्धी महा मार्गाचे काम सुरू असताना विदर्भातील ज्या खासदारांनी कथित स्वार्थासाठी या कामात अडथळा निर्माण केली होता केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी उद्धव ठाकरेंना पत्र लिहून सविस्तर सांगितले होते हा गंभीर मुद्दा विधान सभेत सुद्धा गाजला त्या वेळी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सभागृहात आस्वासन दिले होते की पुन्हा गडकरी यांना संधी देणार नाही या तक्रारीत खासदार जाधव यांचा ही समावेश होता.**युट्यूब,व्हॉटस्प,फेसबुक आदी प्रसारमाध्यमातून जमीन स्थारांवरील कार्यकर्ता उघडपणे बोलत आहे. आणि आपल्या भावना पक्षश्रेष्टीजवळ पोहचवत आहेत.**

(मतदारांचा कानोसा...)

### महायुतीला भाईजीच योग्य पर्याय...

**भाजप,शिवसेना, आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी आणि आठवले गटाच्या महायुतीचा सर्व मान्य उमेदवार म्हणून सहकार महर्षी राधेश्याम उपाख्य भाईजी चांडक हे एक समर्थ उमेदवार म्हणून योग्य ठरु शकतात. जिल्ह्याच्या विकासाचे व्हिजन असेलेले उमेदवार होउ शकतात भाईजी. आपल्या पतसंस्था,शिक्षण संस्था, अशा विविध न्याविण्यपुर्ण आणि समाजाभिमुख उपक्रमातून भाईजींनी जिल्ह्यातील हजारो तरुण बेरोजगार युवक युवतींना रोजगार दिला. सतत देत आहेत. रोजगार दिल्यामुळे जिल्ह्यातील हजारो युवक स्वत:हाच्या पायावर उभे राहिले ही वस्तुस्थिती आहे अनेक लहान मोठे उद्योग करणाऱ्या उद्योजकांना अर्थ सहाय्य देऊन स्वतः हाच्या पायावर उभे केले थोडक्यात पंत प्रधान मोदींच्या योजने प्रमाणे कार्य केले व करीत आहेत त्या मुळे असा व्हिजन असलेला विकास पुरुष मोदींजींच्या टीम मध्ये असणे आवश्यक आहे भाईजींच्या नावाने मतदार राजाने एक पर्याय सुचवला आहे.**

## सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरण प्रतिबंध कायद्यांतर्गत कार्यवाही...

जनसंचलन/बुलडाणा

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरण प्रतिबंध कायद्यांतर्गत कार्यवाही करण्यात येत आहे. निवडणुकीतील उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधींनी परवानगी घेऊनच होर्डींग, बॅनर, पोस्टर्स लावावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी निवडणूक कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. निवडणूक कार्यक्रम घोषित केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचार संहिता अंमलात आली आहे. काही व्यक्ती, संस्था यांच्याकडून मोठ्याप्रमाणात अनाधिकृत होर्डींग, बॅनर्स, पोस्टर्स आणि भिंतीवर जाहिराती लावून शहराचे विद्रुपीकरण केले आहे. तसेच निवडणूक कालावधीत राजकीय पक्ष अथवा पक्षाशी संबंधित व्यक्ती, संस्था यांच्याकडून होर्डीग, बॅनर्स, पोस्टर आणि भिंतीवर जाहिराती लावून शहराचे विद्रुपीकरण करण्याची शक्यता आहे. भारत निवडणूक आयोगाने मालमत्ता विद्रुपीकरण करण्यास प्रतिबंध करण्यासंबंधी दिलेल्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहे. त्यानुसार नगर पालिका, नगर पंचायत आणि ग्रामीण भागात निवडणूकीच्या कालावधीमध्ये होर्डीग, बॅनर, पोस्टर आणि भिंतीवर जाहिरात प्रदर्शित करताना संबंधित स्थानिक प्राधिकरणाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे. तसेच परवानगी घेतले-ली मुदत संपल्यानंतर ते नष्ट करुन इमारती. मालमत्ता पुर्ववत करून घेणे, जाहिराती तात्काळ काढून घेणे आवश्यक आहे. यासाठी जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण पाटील यांना फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन निवडणूकीच्या कालावधीमध्ये शासकीय, निमशासकीय सार्वजनिक मालमत्तेची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरुपात विद्रुपीकरण करण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात आले आहे. सदरील आदेश जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी निर्गमित केले आहे.

## द्वारका फाउंडेशनच्या अभियांत्रिकी व फार्मसी महाविद्यालयाचा पदवी वितरण सोहळा संपन्न

जनसंचलन/बुलडाणा



द्वारका फाउंडेशनच्या अभियांत्रिकी व फार्मसी महाविद्यालयाचा पदवी वितरण सोहळा संपन्न बुलढाणा-द्वारका बहुउद्देशीय ग्रामीण विकास फाउंडेशन द्वार संचालित राजर्षी शाहू कॉलेज ऑफ इंजीनियरिंग बुलढाणा व श्री.संत गजानन महार-ाज कॉलेज ऑफ फार्मसी बुलढाणा यांचा संयुक्त पदवी वितरण सोहळा, दि. २१ मार्च २०२४ रोजी द्वारका बहुउद्देशीय ग्रामीण विकास फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तसेच बुलढाणा विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार मा. श्री.धृपतरावजी सावळे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेच्या सह-सचिव ऍड.सौ.कीर्तीताई पऱ्हाड यांच्या हस्ते करण्यात आले कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मा. डॉ. श्री. रवींद्र मुंदरे इतिहास विभाग प्रमुख राधाबाई गोयंका महिलामहाविद्यालय, अकोला तथा सिनेट सदस्य संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती उपस्थित होते. तसेच संत गजानन महाराज कॉलेज ऑफ फार्मासि चे प्राचार्य डॉ. श्री. गौरव हरलालक, व राजर्षी शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रा. श्री.बी.व्ही.नरवाडे यांनी सुद्धा व्यासपीठावर स्थान भूषवले.

# वाघाळा येथील युवकाची आत्महत्या




**जनसंचलन/साखरखेर्डा**

येथील पोलिसा ठाण्यांतर्गत येत असलेल्या वाघाळा शिवारात एकाने झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना २२ मार्च रोजी सकाळी उघडकीस आली. विशाल विजयसिंग इंगळे (२७) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. वाघाळा येथील पोलिस पाटील कडूबा बाळू राठोड यांनी यासंदर्भात साखरखेडा पोलिस ठाण्यास माहिती दिली वा-घाळा शिवारात निवृत्ती वायाळ यांच्या शेतातील पळसाच्या झाडाला विशाल इंगळे याने आत्महत्या केल्याचे अनुषंगिक तक्रारीत म्हटले आहे. बीट जमादार निवृत्ती पोफळे आणि पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. मृत पावलेला युवक एका बँकेत एजंट म्हणून काम करीत होता, अशी माहिती आहे. नेमक्या कोणत्या कारणाने त्याने आत्महत्या केली ही बाब स्पष्ट होऊ शकली नाही. प्रकरणी साखरखेडा पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

# चिखलीत पोलिसांनी दुचाकी चोरट्यांना पकडले; दोन दुचाकीही केल्या जप्त

**जनसंचलन/ चिखली**

शहर व परिसरात दुचाकी चोरीचे प्रमाण वाढले आहे. या अनुषंगाने दाखल तक्रारींची गंभीरतेने दखल घेत चिखली पोलिसांनी शेख शाहरुख शेख इस्माईल (रा. गौरक्षणवाडी) व गणेश राजू भालेराव (रा. भीमक्रांती नगर चिखली) या दोन चोरट्यांना ताब्यात घेत त्यांच्याकडून चोरीच्या दोन दुचाकी जप्त केल्या आहेत. स्थानिक सहारा पार्क मधील अण्णा शंकर डुकरे यांची ४ फेब्रुवारीच्या रात्री घरासमोर उभी केलेली दुचाकी चोरीला गेली होती. याबाबत पोलिसांमध्ये त्यांनी तक्रार दाखल केली होती. यापृष्ठभूमीवर ठाणेदार संग्राम पाटील यांनी पोलिस उपनिरीक्षक सचिनसिंह चौहान, महिला पोलिस हवालदार शांता मगर, पोलिस अंमलदार ज्ञानेश्वर शिंदे, पंढरी मिसाळ व प्रशांत धंदर यांचे पथक तयार करुन तपासकामी लावले दुचाकी चोरट्यासंह जप्त केलेल्या दुचाकी व कारवाई करणारे पोलिस. होते. सदर पथकाने गोपनीय व तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपी शेख शा-हरुख शेख इस्माईल व गणेश राजू भालेराव यांना अटक केली. न्यायालयाने त्यांना तीन दिवसांचा पीसीआर दिला होता. यादरम्यान आरोपींनी चोरीची कबुली दिल्यानंतर त्यांच्याकडन राजर (जि. जालना) येथन एमएच २८-एआर- ४४५० व एमएच १६ सीबी ३२१२ डिलक्स अशा दोन दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. तपासादरम्यान सदर आरोपींनी पुणे व बुलढाणा शहरासह इतरही ठिकाणी चोरी केल्याबाबत माहीती दिली असल्याने अनेक गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.




# बुलढाणा लोकसभेसाठी महाविकास आघाडी कडून काँग्रेसच्या प्रदेश सचिव ॲड. जयश्री शेळके यांच्या नावाची जोरदार चर्चा...

## उद्धव ठाकरे यांनी साताऱ्यातून चंद्रहार पाटील यांची उमेदवारी घोषित केल्याने बुलढाण्याची जागा काँग्रेसकडे येण्याची शक्यता...

## लोकसभा लढवण्यास इच्छुक असलेल्या ॲड. जयश्री शेळके प्रबळ दावेदार...

**जनसंचलन/बुलढाणा**

उद्धव ठाकरे यांनी सांगली मधून चंद्रहार पाटील यांची सभेतून उमेदवारी जाहीर केली, मात्र एक दिवसापू-र्वीच उद्धव ठाकरे यांनी बुलढाण्यात आल्यानंतर उमेदवाराच्या नावाचा उल्लेख करणेही टाळले त्यामुळे सक्षम उमेदवार नसल्यामुळे उद्धव ठाकरे अजूनही उमेदवाराची चाचपणी करत असल्याच बोलल जात आहे.. तर दुसरीकडे सांगली च्या जागेवरून काँग्रेस आणि उद्धव ठाकरे गटात असलेला तिढा आता सुटल्याच पाहायला मिळत आहे, उद्धव ठाकरे यांनी सांगलीच्या उमेदवाराची घो-षणा केल्याने बुलढाण्याची जागा ही काँग्रेसकडे येण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे, आणि त्यासाठी राष्ट्रीय काँग्रेसच्या प्रदेश सचिव ॲड. जयश्री शेळके ह्या प्रबळ दावेदार मानल्या जात आहेत.. जयश्री शेळके यांचे सहकार क्षेत्रात असलेले योगद-ान, बचत गटाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण, संघटन कौशल्य पाहता सर्वच बाबतीत त्या सक्षम उमेदवार असल्याचं बोललं जात आहे, तर



पक्षाने आदेश दिल्यास आपण लोकसभा निवडणूक लढवण्यास इच्छुक असल्याची प्रतिक्रिया जयश्री शेळके यांनी दिली आहे...

# नामनिर्देशनपत्र दाखल करताना तीन वाहने,पाच व्यक्तींना प्रवेश

**जनसंचलन/बुलढाणा**

भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी कार्यक्रम दि. १६ मार्च २०२४ रोजी घोषित केला आहे. निवडणूक कार्यक्रम घोषित केल्यापासून आदर्श आचार संहिता अंमलात आली आहे. बुलडाणा लोकसभा मतदारसंघासाठी दि. २८ मार्चपासून नामनिर्देशन दाखल करण्यात येणार आहे. नामनिर्देशनपत्र दाखल करताना उमेदवारांना तीन वाहने आणि पाच व्यक्तींना प्रवेश दिला जाणार आहे. उमेदवारांनी नामनिर्देशन दाखल करतेवेळी अवलंब करावयाची कार्यपद्धतीबाबत जिल्हाधिकारी यांनी आदेश दिले आहे. त्यानुसार जिल्ह्यात लोकसभा निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय आणि न्यायपूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक कालावधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल करते वेळी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात वाहनांच्या ताफ्यामध्ये तीन पेक्षा जास्त मोटार गाड्या वाहने यांचा समावेश नसावा. तसेच नामनिर्देशन पत्र दाखल करते वेळी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या दालनात पाच व्यक्तींना प्रव-ेश देण्यात येणार आहे.नामनिर्देशनपत्र दाखल करतेवेळी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालय किंवा कार्यालयाच्या परिसरात मिरवणूक, सभा घेणे, कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे वाद्य वाजविणे किंवा गाणी म्हणणे आणि कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करण्यास प्रतिबंध घालणे आवश्यक आहे. त्यानुसार सर्व संबंधिताना नोटीस देऊन त्याचे म्हणने ऐकून घेणे सद्यस्थितीत शक्य नसल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) नुसार एकतर्फी आदेश काढणे आवश्यक आहे. त्यानुसार जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण पाटील यांना फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३चे कलम १४४ नुसार प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीच्या कालावधीत जिल्ह्यात निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय आणि न्यायपूर्ण वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टिकोनातून निवडणूक कालावधीत निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र दाखल करतेवेळी वाहनांच्या ताफ्यामध्ये तीनपेक्षा जास्त मोटारगाड्या वाहने यांचा ताफ्यात




समावेश नसावा, उमेदवारानी नामनिर्देशनपत्र दाखल करते वेळेस निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाच्या १०० मीटर परिसरात, तसेच दालनात पाच व्यक्तीव्यतिरिक्त कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कायर्यालयात नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळी कायर्यालयाच्या परिसरात मिरवणूक, सभा घेणे, कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे वाद्य वाजविणे किंवा गाणी म्हणणे आणि कोणत्याही प्रकारच्या निवडणूक प्रचार करण्यास प्रतिबंध घालण्यात आले आहे. सदर आदेश दि. १६ मार्च २०२४ पासून दि. ६ जून २०२४ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत संपूर्ण जिल्ह्यात अंमलात राहणार आहे, असे आदेश जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिले आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# सैलानी यात्रेत सौदार्हपूर्ण वातावरण ठेवावे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांचे आवाहन

जनसंचलन/बुलढाणा

असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या सैलानी येथील उत्सवाला सुरुवात झाली आहे. सर्वधर्मियांच्या सहभागाने याठिकाणी यात्रा भरते. या यात्रेत नागरिकांनी सौदार्हपूर्ण वातावरण ठेवावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. सैलानी येथे कोणतीही प्राणी इजा होऊ नये, यासाठी नागरिकांनी काळजी घ्यावी. याठिकाणी कत्तलीचे प्रकार टाळण्यासाठी प्रयत्न करावेत. यासाठी जनजागृती करावी. तसेच याठिकाणी मोठ्या प्रमाणावर नारळाची होळी भरते. यात पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे. पर्यावरणाचे संतुलन राखण्यास मदत करावी. तसेच होळी सणाला अनिष्ट प्रथा टाळाव्यात. सैलानी यात्रोत्सवात नागरिकांनी अंधविश्वास न बाळगता श्रद्धा ठेवावी. तसेच संपूर्ण यात्रेत सौदार्हता टिकून राहण्यासाठी खबरदारी घ्यावी. यासाठी सामाजिक संस्थांनी पुढाकार घेऊन विविध बाबींवर जनजागृती करावी. यात्रेदरम्यान याठिकाणी मोठी गर्दी होणार असल्याने येथील वाहतूकीत बदल करण्यात आला आहे. गर्दीमुळे नागरिकांना त्रास होणार नाही, याची काळजी घ्यावी. तसेच वाहनांची संख्या जादा असल्याने अपघात होणार नाही, याची काळजी घ्यावी. यात्रेत गर्दी टाळण्यासाठी दर्शन घेऊन बाहेर पडावे. ज्यामुळे येथील व्यवस्थेवर ताण पडणार नाही. तसेच कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होणार नाही. यात्रेसाठी येणाऱ्या नागरिकांनी



जबाबदारीने वागावे. याचा महिलांना त्रास होणार नाही, याची काळजी घ्यावी. प्रशासनाने नागरिकांसाठी पाण्याची सोय केली आहे. पाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध असले तरी नागरिकांनी पाण्याचा जपून वापर करावा, पाण्याची नासाडी होवू नये, यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# प्रचार वाहनांवर कापडी फलक, झेंडे लावण्यावर निर्बंध...

जनसंचलन/बुलडाणा

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकी आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. सदर निवडणूकीच्या प्रचार मोहिमेच्या कालावधीत सर्व राजकीय पक्षाचे उमेदवार, तसेच निवडणूक लढविणारे उमेदवार आणि त्यांचे कार्यकर्ते आणि हितचिंतकांना निवडणूक प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनावर पक्ष प्रचाराचे फलक लावणे, झंडे लावणे आदी बाबींसाठी निर्बंध घालण्यात आले आहे. या निर्बंधाचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन प्रचार वाहनांबाबत निर्बंध घातले आहे. फिरत्या वाहनांवर पक्ष प्रचाराचा झेंडा हा वाहनाच्या डाव्या बाजूला विंड स्क्रिन ग्लासच्यापुढे राहणार नाही आणि तो त्या वाहनाच्या टपापासून २ फुट उंचीपेक्षा जास्त राहणार नाही. प्रचाराच्या फिरत्या वाहनांवर कापडी फलक वाहन चालकाच्या आसनामागे वाहनाच्या डाव्या आणि उजव्या बाजूला लावण्यात यावा, इतर कोणत्याही बाजूस तो लावता येणार नाही. फिरत्या वाहनांवर लावावयाचा पक्ष प्रचाराचा झेंडा किंवा कापडी निवडणूक फलक संबंधित पक्षाचे जिल्हाध्यक्ष, उमेदवार आणि उमेदवाराचे प्रतिनिधी निवडणूक प्रचारासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून अधिकृत परवानगी घेतलेल्या वाहनाव्यतिरिक्त इतर कोणत्याही वाहनावर लावता येणार नाही. सदरचे आदेश निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत लागू राहणार आहे, असे आदेश जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी निर्गमित केले आहे.

# निवडणूक कालावधीत ध्वनीक्षेपक वापरावर निर्बंध...



जनसंचलन/बुलडाणा

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये प्रचार मोहिमेच्या कालावधीत सर्व राजकीय पक्षाचे उमेदवार, तसेच निवडणूक लढविणारे उमेदवार आणि त्यांचे कार्यकर्ते आणि हितचिंतक यांच्या ध्वनक्षेपक वापरावर निर्बंध घालण्यात आले आहे. प्रचार वाहनावर ध्वनिक्षेपक बसवून मोठ्या आवाजात प्रचार केल्याने ध्वनी प्रदूषण होणे, सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनातील शांतता आणि स्वास्थास बाधा पोहोचण्याची आणि उशीरा रात्रीपर्यंत ध्वनीक्षेपण यंत्रणा चालू ठेवण्याची शक्यता असल्यामुळे ध्वनीक्षेपक वापरावर निर्बंध घालणे आवश्यक आहे. जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण पाटील यांना मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३ (एन) मधील प्राप्त अधिकारानुसार निवडणुकीच्या प्रचारासाठी ध्वनीक्षेपकाचे वापरावर निर्बंध घालण्यात आले आहे. यात ध्वनीक्षेपकाचा वापर पोलिस अधिकारी यांच्या परवानगीशिवाय करता येणार नाही, सकाळी ६ वाजण्यापूर्वी आणि रात्री १० वाजल्यानंतर कोणतेही फिरते वाहन आणि कोणत्याही क्षेत्रात ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही, दिवसा प्रचाराकरीता फिरत्या वाहनांनी ध्वनीक्षेपकाचा वापर विशिष्ट ठिकाणी थांबूनच करावा, ध्वनीक्षेपकाच्या आवाजासह फिरणाऱ्या वाहनांना प्रतिबंध आहे. सर्व राजकीय पक्ष आणि उमेदवार आणि इतर व्यक्तींनी निश्चित ठिकाणी ध्वनीक्षेपकाचा वापरासंबंधी घेतलेल्या परवानगीची माहिती जिल्हादंडाधिकारी संबंधित सहायक निवडणूक निर्णय अधिकारी आणि संबंधीत यंत्रणेस कळविणे बंधनकारक राहणार आहे. सदरचे आदेश निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अंमलात राहणार आहे, असे आदेश जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिले आहे.

# ग्रंथालय संचालनालयातर्फे ग्रंथ खरेदीची यादी जाहीर

जनसंचलन/बुलढाणा

राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान योजनेंतर्गत ४८ व ४९ व्या ग्रंथ भेट योजनेंतर्गत ग्रंथांच्या खरेदीसाठी सन २०२१ व सन २०२२ मध्ये प्रकाशित व ग्रंथालय संचालनालयास प्राप्त ग्रंथांपैकी निवड केलेल्या मराठी ४८५, हिंदी २०४ व इंग्रजी २२१ अशा एकूण ९१० ग्रंथांची निवड करण्यात आली आहे. या ग्रंथांची यादी उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या htedu.maharashtra.gov.in/maim/ या संकेतस्थळावर १८ ते ३० मार्च २०२४ या कालावधीत अवलोकनार्थ खुली ठेवण्यात आली आहे. या ग्रंथ यादीतील ग्रंथ किमान ३० टक्के सूट दराने वा त्यापेक्षा अधिक सूट दर देण्यास तयार असल्यास त्या सूट दराप्रमाणे ग्रंथांचा पुरवठा करणे आवश्यक राहील. याबाबत प्रकाशक, वितरकांनी देयकात स्पष्टपणे नमूद करावे. या संदर्भात यादीतील कोणत्याही ग्रंथाबाबत सूचना, हरकती, आक्षेप असल्यास ३० मार्च २०२४ पर्यंत ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगरभवन, मुंबई- ०१ यांच्याकडे लेखी स्वरूपात कार्यालयीन वेळेत हस्त बटवड्याने, टपालाने किंवा ई- मेलवर मुदतीत पाठवावेत. त्यानंतर आलेल्या सूचना, हरकती आणि आक्षेपांचा विचार केला जाणार नाही. तसेच यादीत ग्रंथाचे नाव, लेखक, प्रकाशक, किमतीत काही बदल असल्यास निदर्शनास आणून द्यावे, असे अशोक मा. गाडेकर, प्र. ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकान्वये कळविले आहे.

# वन बुलडाणा मिशनच्या परिवर्तन रथयात्रेला मातृतीर्थ सिंदखेडराजा तालुक्यात अभूतपूर्व प्रतिसाद!

जनसंचलन/बुलढाणा


मातृतीर्थ सिंदखेडराजा ही पावन पुण्यभूमी आहे. या भूमीने महाराष्ट्राला मासाहेब जिजाऊ दिल्या, जिजाऊंच्या पोटी स्वराज उभे करणारे छत्रपती शिवाजी महाराज जन्माला आले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेली ही भूमी आहे. मात्र पुढाऱ्यांनी केवळ राजकारणापुरता महाराजांच्या नावाचा वापर केला. एवढं ऐतिहासिक महत्व असून देखील सिंदखेडराजा नगरीचा विकास नाही. आराखड्यावर आराखडे येतात मात्र ते कुणाच्या घशात जातात? असा सवाल करीत तुम्ही मला आशीर्वाद द्या, मी तुम्हाला विकास म्हणजे काय असते ते दाखवुन देतो असे प्रतिपादन वन बुलडाणा मिशनचे संकल्पक संदीप शेळके यांनी केले. वन बुलडाणा मिशनची परिवर्तन रथयात्रा २२ मार्चला मातृतीर्थ सिंदखेडराजा तालुक्यात दाखल झाली,.यावेळी विविध गावांत शेळके यांनी संवाद साधला, यावेळी ते बोलत होते. पुढे बोलतांना संदीप शेळके म्हणाले की, विकास म्हणजे केवळ रस्ते, नाल्या, सभामंडप नाही. पुढाऱ्यांना ज्यातून टक्केवारी मिळते त्यालाच ते विकास समजतात. जिल्ह्याच्या रोजगाराच्या मुद्द्यावर विद्यमान खासदारांनी किती वेळा संसदेत आवाज उठवला? शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या धोरणावर किती वेळा आवाज उठवला? असा सवाल त्यांनी केला. दिल्लीत काय तुम्हाला खुर्च्या उबवण्यासाठी पाठवले का असेही संदीप शेळके म्हणाले.

लोणार, सिंदखेडराजा, शेगाव, ज्ञानगंगा अभयारण्य, अंबाबारवा अभयारण्य या पर्यटनस्थळांच्या विकासासाठी विशेष प्रयत्न करणार असल्याचेही संदीप शेळके म्हणाले. बुलडाणा जिल्ह्याची मागासलेपणाची ओळख पुसून टाकण्यासाठी लोकसभा निवडणुकीत परिवर्तन गरजेचे असल्याचे सांगत आपल्याला मतदान रुपी आशीर्वाद देण्याचे आवाहन त्यांनी केले.मोताळा, शेगाव, संग्रामपूर, खामगाव, मेहकर, लोणार या तालुक्यांचा प्रवास पूर्ण करून २२ मार्चला यात्रा सिंदखेडराजा तालुक्यात पोहचली. साखेड तेजन, आडगाव राजा, वडाळी, सुलजगाव, धांदरवाडी, वसंतनगर, डावरगाव, अंचली, बुट्टाटांडा, धानोरा, चांगेफळ, रुम्हणा, सोयंदेव या गावांतील मतदारांशी संदीप शेळकेंनी संवाद साधला.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# आघाडीत बिघाडी? ठाकरेंकडील परभणीत मित्रपक्षाकडून थेट उमेदवाराची घोषणा, संजय जाधवांना धाकधूक?...



**वृत्तसंस्था/मुंबई**

इंडिया आघाडीतील घटक पक्षांमध्ये धुसफूस असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. कारण भारतीय कम्युनिस्ट पक्ष अर्थात भाकपने महाराष्ट्रातून उमेदवार उतरवण्याचा निर्णय घेतला आहे. भाकपने परस्पर तिकीट जाहीर करुन महाविकास आघाडीला धक्का दिला आहे. विशेष म्हणजे उद्धव ठाकरे यांच्यासोबत असलेल्या खासदाराच्या मतदारसंघातच भाकपने शड्डू ठोकला आहे. त्यामुळे ठाकरेंना ती जागा टिकवण्यात अडसर येतील का, असा प्रश्न विचारला जात आहे. भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या केंद्रीय कार्यालयातून लोकसभा निवडणुकांसाठी तीन उमेदवारांची घोषणा करण्यात आली आहे. तामिळनाडूतील तिरुप्पुर येथून कॉम्रेड के सुब्बरायन, नागपट्टीनाम येथून कॉम्रेड व्ही सेल्वराज, तर महाराष्ट्रातील परभणी लोकसभा मतदारसंघातून कॉम्रेड राजेंद्र रामचंद्र क्षीरसागर यांना तिकीट जाहीर करण्यात आलं आहे. राजेश क्षीरसागर यांनी २०१९ मध्येही परभणीतून लोकसभा लढवली होती.परभणी लोकसभा मतदारसंघातून सध्या संजय जाधव हे शिवसेनेच्या तिकिटावर खासदार आहेत. शिवसेनेत फूट पडल्यानंतरही जाधव यांनी उद्धव ठाकरे यांच्यासोबत राहणे पसंत केले. जाधव हे २०१४ आणि २०१९ असे सलग दोन वेळा परभणी लोकसभा मतदारसंघातून खासदारपदी निवडून आले आहेत. त्यामुळे सलग विजयाची हॅट्ट्रिक साकारण्यास ते उत्सुक आहेत. परंतु इंडिया आघाडीतील भाकपने उमेदवारी जाहीर केल्याचा फटका त्यांना बसणार का, हा प्रश्न आहे.उद्धव ठाकरे यांनी आपल्या लोकसभा उमेदवारांची यादी जाहीर केलेली नाही. परंतु निष्ठावान राहिलेल्या जाधवांना पुन्हा तिकीट मिळणं साहजिक मानलं जातं.१९९९ पासून हा शिवसेनेचा बालेकिल्ला बनला आहे. १९९९ च्या निवडणुकीत शिवसेनेने येथून संजय जाधव यांना तिकीट दिले होते आणि ते विजयी झाले होते. २००४ मध्ये तुकाराम रेंगे पाटील, २००९ मध्ये गणेशराव दुधगावकर आणि २०१४ आणि २०१९ मध्ये संजय जाधव पुन्हा खासदार झाले.२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत शिवसेना उमेदवार संजय जाधव ५ लाख ३८ हजार २१४ मतांनी विजयी झाले होते. त्यांनी राष्ट्रवादीच्या राजेश उत्तमराव विटेकर यांचा पराभव केला होता. ४१ हजार ८४२ च्या मताधिक्याने ते विजयी झाले होते.

---

## वादातून माहेरी राहणाऱ्या पत्नीवर पतीनेच केला चाकूहल्ला



**जनसंचलन/ खामगाव**

दिवसेंदिवस महिलांवर अत्याचाराच्या घटना वाढत चाललेल्या आहे.शुल्क कारणांवरून महिलांवर मोठ्या प्रमाणात अत्याचार होतांना दिसून येत आहे अशीच एक घटना खामगाव येथे घडली आहे.पती-पत्नीत वाद झालेला असतानाही एका युवकाने पत्नीस बळजबरीने ऑटोत बसविले. त्यानंतर तिच्यावर चाकू हल्ला करून जखमी केले. ही घटना घटना गुरुवारी दुपारी जिया कॉलनी भागात घडली. तक्रारीनुसार, शिरीन परवीन शेख सादिक या विवाहितेचा तिच्या पतीसोबत वाद आहे. तिने खामगाव शहर पोलिसात तक्रार दिली असून, सध्या ती खामगाव येथे माहेरीच राहते.. गुरुवारी विवाहिता आणि तिची आई चौकशी कामी पोलिसात जाण्यासाठी घरून निघाल्या होत्या. यावेळी तिचा पती शेख सादिक शेख मुस्ताक (रा. जळगाव जामोद) हा ऑटो घेऊन आला. त्याने पत्नी शिरीन व तिच्या आईला बळजबरीने ऑटोत बसविले. त्यानंतर त्याने चाकू काढून शिरीन हिच्या गळ्यावर मारण्याचा प्रयत्न केला. शिरीन त्यात जखमी झाली.. दोघी मायलेकींनी आरडा-ओरड करत त्याच्या तावडीतून सुटका करुन घेतल्याचा आरोप तक्रारीत केला. या तक्रारीवरून पोलिसांनी पती शेख सादीक शेख मुश्ताक विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## खावटी न देण्याच्या कारणावरून एकास जिवे मारण्याचा प्रयत्न...

### राजूर घाटातील घटना चार जणांवर गुन्हे दाखल

**जनसंचलन/मोताळा**

खावटी का देत नाही, असे म्हणत रस्त्यात वाहन अडवून एकास गाडीतून ओढून विषारी औषध पाजून जिवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला. तसेच चाकू मारून जखमी केल्याची घटना २१ मार्च रोजी सायंकाळी राजूर घाटात घडली. तक्रारीवरून पोलिसांनी चार जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. तालुक्यातील बोराखेडी येथील सुभाष किसन कुटे यांनी याप्रकरणी पोलिसांत तक्रार दिली. २१ मार्च रोजी ते त्यांच्या वाहनाने बुलढाण्याकडून घरी येत होते. दरम्यान, संध्याकाळी साडेसात वाजेच्या सुमारास बुलढाणा ते मलकापूर मार्गावर राजूर घाटातील देवीच्या मंदिरापासून मोताळ्याकडे एक किलोमीटर अंतरावर राजूर




शिवारात बलढाणा येथील जयमंदा डॅनियल जाधव, जयंत डॅनियल जाधव, जगदीश डॅनियल जाधव, जयनंदा डॅनियल जाधव (सर्व रा. तेलगुनगर, बुलढाणा) यांनी संगनमत करून सुभाष कुटे यांची गाडी अडवून त्यांना गाडीतून ओढून खावटी का देत नाही, असे म्हणत विष पाजून जिवे मारण्याचा प्रयत्न केला. जयंत जाधव याने चाकूने हातावर मारून जखमी केले. लाथाबुक्क्यांनी मारहाण करीत शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली, अशी तक्रार सुभाष कुटे यांनी बोराखेडी पोलिसांत दिली. यासोबतच अन्य बाबींचाही उहापोह केला आहे. त्यावरून उपरोक्त व्यक्तींविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा तपास सहायक पोलिस निरीक्षक राजवंत आठवले आणि पोलिस कॉन्स्टेबल आकाश यादव हे करीत आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958